# तो आणि ती

आधुनिकीकरणाचा शहरी समुदायावर होणारा परिणाम या विषयावर प्रोफेसर बोलत होते. साधारण पहिला अर्धातास संपल्यावर सरांचे लेक्चर नेहमीप्रमाणे कंटाळवाणे होऊ लागले व मी दरवाजाच्या कांचेतून बाहेर बघू लागले.विद्यार्थी-विद्यार्थिनी जात येत होते नि मला तो दिसला. माझ्या होस्टेलमध्ये राहणारा अपंग मुलगा. त्याची व्हीलचेअर थांबली होती आणि मोठ्या मुष्कीलीने, आपल्या अधु बोटांना लावलेल्या धातुच्या पट्ट्यांनी तो खुर्चीच्या हातावर बसविलेल्या बटनांशी धडपड करीत होता. भान न राहवून मी वर्गातून उठले व बाहेर पडून धावतच त्याच्या खुर्चीपर्यंत गेले. खुर्ची सुरू करून वळवून दिली व तो निघून गेला. आज प्रथमच त्याला मी इतक्या जवळून पाहिले. त्याचे दोन्ही हात व दोन्ही पाय लुळे होते, तो मुका होता व त्याची मान कांही क्षणां शिवाय जास्त वेळ स्थिर राहू शकत नव्हती. स्वत:तच हरविलेल्या त्याला मी त्यांच्या व्हीलचेअरवरून जाताना अनेकदा पाहिले होते.

त्या मुलाचा विचार करीतच मी वर्गात परतले व मला एकदम आठवले, स्प्रिंग टर्मच्या पहिल्या दिवशी स्टुडंट न्यूजपेपरच्या पहिल्या पानावर त्याचा फोटो आला होता. हिवाळ्यात पोहण्याचा तलाव बंद असे. वसंतऋतुची चाहूल लागताच 'आऊटडोअर ॲक्टिव्हिटीज' सुरू होत. पोहण्याचा तलाव विद्यार्थ्यांसाठी खुला होई. 'लाईफ गार्डस' आपल्याला निश्चित सांभाळतील या विश्वासाने, त्या अपंग मुलाने स्प्रिंग टर्मच्या पहिल्या दिवशी व्हील चेअरवरून पाण्यात उत्साहाने उडी मारली. एकदा विन्टरमध्ये वर्फावरून त्याची व्हील चेअर घसरली तेव्हा कांही विद्यार्थ्यांनी धावत जाऊन व्हील चेअर पकडली म्हणून पुढे होणारा अप-

घात टळला. एकूण या मुलाची जगण्याची जिद्द, जीवनांबद्दल आस्था, उत्साह सारे, सारे वाखाणण्याजोगे होते. या मुलाची कीव करण्याचे काही-ही कारण नाही हे लक्षात आले व दुसऱ्याच क्षणी त्याच्या विचारांनी मला आगळीच स्फूर्ती दिली. सर्व अवयव शाबूत असणे हे केवढे मोठे भाग्य आहे याची पहिल्यांदाच जाणीव झाली व निराश होता कामा नये असे स्वत:ला बजावले. ओठांवर शब्द आले, 'थँक्यू, फ्रेन्ड'.

दिवसभराचा अभ्यास संपवून मी घाईघाईने होस्टेलकडे परतले कारण आज 'व्हॅलन्टाईन्स डे' असल्याने स्पेशल जेवण होते व सातच्या आत पोहोंचले नाही तर कॅफेटेरिया बंद झाला असता. वर्गात, एका अमे-रिकन मैत्रिणीला, 'व्हॅलन्टाईन्स डे' का साजरा करतात? हा प्रश्न विचारून माझी जिज्ञासा भागवून घेण्याचा प्रयत्न केला. तिने दिलेल्या माहितीतून एवढेच समजले होते की, हा मूळचा फ्रान्स व इंग्लंडमधील रिवाज आहे. १४ फेब्रुवारी या सेंट व्हॅलेन्टाइन्स डे च्या संध्याकाळी तरूण-तरूणी एकत्र जमत असत. सर्वांच्या नांवाच्या चिठ्या एकत्र ठेवून त्यातील एक चिठ्ठी उचलीत. चिठ्ठीवर ज्या व्यक्तिचे नांव असेल तो/ती चिठ्ठी उचल-णाऱ्याची व्हॅलेन्टाईन किंवा स्वीटहार्ट आहे असे पुढच्या व्हॅलेन्टाईन्स डे पर्यंत समजले जाई. अमेरिकन मुला-मुलींनी या रिवाजाला आपल्याला सोईस्कर असे रुप दिले आहे. अमेरिकन मुलेमुली आपल्याला आव-डणाऱ्या व्यक्तिला व्हॅलन्टाईन्स डे ग्रिटींग कार्ड पाठवून 'यूवर सिक्रेट लव्हर' किंवा 'यूवर सिक्रेट अॅडमायरर' अशी सही करतात वा अन्य रीतीने आपल्या भावना व्यक्त करतात. तरूण-तरूणींना आपल्या भावना व्यक्त करायला एक रोमहर्षक संध्याकाळ देणारा दिवस म्हणजे व्हॅले-न्टाईन्स डे अशी मनाशी सोपी व्याख्या करीत, मी होस्टेलच्या दारातून आत शिरले व लॉबीमध्ये एका बोर्डजवळ विद्यार्थ्यांची गर्दी पाहून कुतूहलाने थांबले. एका लाकडी स्टँडवर, हृदयाच्या आकाराचा मोठा कार्डबोर्डचा तुकडा, रंगीबेरंगी कागदांनी सजवून लावला होता. कांही विद्यार्थी-विद्यार्थिनी त्यातील एकेक छोटा कोपरा शोधून आपल्या 'सिक्रेट-लव्हर' साठी निरोप लिहीत होते. बाकीचे विद्यार्थी बोर्डावर लिहीलेली मिनी प्रेमपत्रं वाचीत होते. त्या गर्दीत तो अपंग मुलगाही होता, त्याच्याकडे

कुणाचे लक्षही जात नव्हते. सकाळीच मी त्याला मदत केली असल्याने त्याने हसून माझ्याकडे पाहिले व मी जवळ जावे असा इशारा केला. मी त्याच्या खुर्चीजवळ गेले. त्याच्या एकूण खाणाखुणांचा अर्थ लावीत त्याच्या खुर्चीच्या पाठीला अडकविलेल्या पिशवीतून एक प्लॅस्टिकची पाटी काढून त्याच्यासमोर धरली. त्या पाटीवर इंग्रजी मुळाक्षरे लिहीलेली होती. तो आपल्या लुळ्या बोटांनी मला कांही अक्षरे दाखवू लागला व त्याने दाखविलेल्या अक्षरांतून तयार झालेले वाक्य मी त्या बोर्डावर लिहावे असे त्याने खुणेने सुचविले. माझ्याजवळ असलेल्या हिरव्या, निळ्या, लाल शाईच्या पेनचा उपयोग करून मी हृदयाच्या आकाराच्या बोर्डच्या कोपऱ्यात छोटे हृदय चितारले व त्यात त्या मुलाला हवे असलेले वाक्य लिहीले. ते पुढीलप्रमाणे होते –

'ल्युसी यू आर ब्यूटीफुल'

त्याच्या चेहऱ्यावरचे समाधान निरखीत मी रूमवर गेले. तोंड धुवून दिवसभराचा थकवा संपविण्याचा प्रयत्न केला व मैत्रिणीला फोन करून कॅफेटेरियात जेवायला येतेस का ? विचारले. आम्ही दोघी जेवायला गेलो, जेवत असता काही मिनिटांपूर्वी घडलेला प्रसंग सांगितला व ही ल्युसी तिच्या माहितीची आहे का ? याची चौकशी केली. तिने सांगितलेल्या माहितीमुळे, प्रेम या भावनेचा एक अगदी वेगळा पैलू माझ्या ध्यानात आला. ज्या ल्युसीला त्या अपंग मुलाने सुंदर म्हटले होते, ती त्याला रोज जेवण चारायला मदत करणारी अधू पायाची मुलगी होती. ल्युसीच्या मदतीची अशी लोभस जाणीव ठेवणारा व ती इतक्या सुंदररित्या व्यक्त करणारा अपंग मुलगा त्या क्षणानंतर माझ्या नजरेला कधीच अपंग दिसला नाही. एक निरागस हृदय, एक स्वच्छ दृष्टिकोण, एका स्वर्गीय मानवतेचा अंश जपणारा तो अमेरिकन मुलगा मला खरोखर खूप देखणा वाटू लागला.

येथे आल्यानंतर काही अनुभवांती वाटू लागले होते की, अमेरिकन स्त्रियांचा एकच चेहरा असतो, 'रंगविलेला चेहरा' आणि अमेरिकन पुरुषांचाही एकच चेहरा असतो, 'नाटकी, फोनी चेहरा'. पण या चेहऱ्यांपलिकडे जाऊन विचार करायला लावणारा, एक न बोलू शकणारा तरीही अत्यंत बोलका चेहरा मला पाहायला मिळाला व अतीव मानसिक समाधान

अनुभवले. या देशात असा निष्पाप, निरागस, मानवी चेहरा पहायला मिळणे ही दुर्मिळ चीज झाली आहे आणि त्यामुळेच का ? या मुलाच्या मानेला ताठपणे जगणे या समाजात जमत नसावे असे वाटले. दर काही सेकंदांनी दोनपैकी एका खांद्याचा आधार घेऊन जगू इच्छिणारी त्याची मान लोकांना वाकडी दिसत असेल पण मला मात्र, एकमेव 'सरळ' चेहरा सांभाळणारी ती ताकदपूर्ण मान वाटते आहे.

त्या मुलाचा 'मान' ठरलेल्या त्या मानेचा व त्याच्या निर्व्याज मनाचा अपंग म्हणून कुणीही अपमान करू नये असंच वाटतं, नेहमीच वाटत राहील. या छोट्या मनाच्या अमेरिकेत मनाचा सरळपणा सापडला पण मनमानी करीत जगणारे त्यालाच वाकडातिकडा, लुळापांगळा व मुका समजताहेत. कदाचित म्हणूनच या देशात नाजूक दवबिंदु देखील गोठून बर्फ बनत असावेत.

♣

**डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर**
**('अमेरिका किती मोठी ? किती छोटी ?' या कथासंग्रहातून)**